महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियमन, २०१२ अंतर्गत स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर नवीन शाळा स्थापन करणे, तसेच विद्यमान शाळेचा दर्जावाढ करण्यासाठी २०१३-१४ या शैक्षणिक वर्षाकरिता परवानगी देण्याबाबत.

# महाराष्ट्र शासन

## शालेय शिक्षण व क्रीडा विभाग

**शासन निर्णय क्रमांकः एसएफएस-१११३/प्र.क्र.१३/एसएम-२**

हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई -४०० ०३२
तारीख: ३० जानेवारी, २०१४

**वाचा -**

१. शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्र. स्वयंअ-२०१३/ ८५/१३)/माशि-१, दिनांक १५ जून, २०१३

२. शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्र. स्वयंअ-२०१३/ (८५/१३)(II) /माशि-१, दिनांक ५ ऑक्टोबर, २०१३

**प्रस्तावना -**

महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियमन, २०१२ अंतर्गत स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर नवीन शाळा स्थापन करणे, तसेच विद्यमान शाळेचा दर्जावाढ करण्यासाठी २०१३-१४ या शैक्षणिक वर्षाकरिता अनुक्रमांक (१) येथील शासननिर्णयान्वये २४१७ संस्था पात्र म्हणून घोषित करण्यात आल्या आहेत. तसेच अनुक्रमांक (२) येथील शासननिर्णयान्वये एकंदर ८२८ एवढ्या शाळा पात्र म्हणून घोषित करण्यात आल्या आहेत. तथापि, सदर शासन निर्णयामध्ये पात्र झालेल्या प्रस्तावांपैकी काही प्रस्तावांच्या शाळांच्या बाबतीत त्यांनी मूळ प्रस्तावामध्ये मागणी केल्यानुसार अभ्यासक्रम, शाळांचे माध्यम, प्राथमिक/ माध्यमिक/उच्च माध्यमिक वा प्राथमिक ते उच्च माध्यमिक शाळा मंजूर झालेल्या नव्हत्या. तसेच, अपात्र झालेल्या प्रस्तावांच्या बाबतीत संबंधित संस्थांनी आपल्या निवेदनाव्दारे बाबी शासनाच्या निदर्शनास आणल्या आहेत. संबंधित संस्थांची निवेदने तसेच, क्षेत्रीय कार्यालयाचे अभिप्राय/अहवालाच्या अनुषंगाने दुरुस्त्या करण्याबाबत प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

**शासन निर्णय -**

महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियमन, २०१२ अंतर्गत स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर नवीन शाळा स्थापन करणे, तसेच विद्यमान शाळेचा दर्जावाढ करण्यासाठी २०१३-१४ या शैक्षणिक वर्षाकरिता सोबत जोडलेल्या सहपत्रांनुसार प्रस्तावांमध्ये दुरुस्ती /सुधारणा करण्यास संदर्भाधीन शासन निर्णय दिनांक १५ जून, २०१३ आणि दिनांक ५ ऑक्टोबर, २०१३ मधील अटी व शर्तींची पूर्तता करण्याच्या अधीन राहून याव्दारे शासन मान्यता देण्यात येत आहे.



Principal
The Lexicon School
Pune - 412308.

२. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१४०२०३१६०८१३७९२१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Ramchandra Ganpat Gunjal

Digitally signed by Ramchandra Ganpat Gunjal
DN: c=IN, o=Government of Maharashtra, ou=School Education & Sports Dept, postalCode=400032, st=Maharashtra, cn=Ramchandra Ganpat Gunjal
Date: 2014.02.03 17:01:47 +05'30'

(रा.ग.गुंजाळ)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे.
२. शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे.
३. प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई
४. सर्व विभागीय आयुक्त.
५. महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई
६. जिल्हा कोषागार अधिकारी. गोंदिया/पुणे/गडचिरोली/ बुलढाणा/औरंगाबाद/ नागपूर/ सोलापूर
७. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) - १/२, मुंबई/नागपूर
८. महालेखापाल (लेखा परीक्षा) - १/२, मुंबई/नागपूर
९. विभागीय शिक्षण उपसंचालक, मुंबई/नागपूर/पुणे/अमरावती/औरंगाबाद
१०. शिक्षण निरीक्षक (पश्चिम), बृहन्मुंबई
११. शिक्षणाधिकारी (प्राथमिक/माध्यमिक) जिल्हा परिषद, गोंदिया/पुणे/गडचिरोली/ बुलढाणा/औरंगाबाद/नागपूर/सोलापूर .
१२. वित्त विभाग (कार्यासन- व्यय-५), मंत्रालय, मुंबई-३२
१३. नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई -३२
१४. मा. मंत्री (शालेय शिक्षण), यांचे खाजगी सचिव
१५. मा. राज्यमंत्री (शालेय शिक्षण), यांचे खाजगी सचिव
१६. मा. मुख्य सचिव ( शालेय शिक्षण व क्रीडा विभाग) मंत्रालय, मुंबई
१७. सर्व सहसचिव/उपसचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई
१८. कक्ष अधिकारी (अर्थसंकल्प), शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई
१९. निवडनस्ती (एसएम-२)

Principal
The Lexicon School
Pune - 412308.

| अ.क्र. | संस्थेचे नाव | शाळेचे नाव/ प्रस्तावित ठिकाण | दि.१५ जून, २०१३/ दि.५ ऑक्टोबर, २०१३ नुसार देण्यात आलेली परवानगी | संस्थेच्या मूळ प्रस्तावातील मागणीनुसार देण्यात आलेली परवानगी |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| ११. | जेनेसिस एज्युकेशन सोसायटी, लुल्लानगर, कोंढवा, पुणे | द.लेक्सिकॉन स्कूल, फुरसुंगी, सासवड रोड, पुणे | अपात्र | **पात्र.**<br>संस्थेच्या नावे १ एकरपेक्षा अधिक जागा आहे.<br>**माध्यम- इंग्रजी**<br>**नवी शाळा**<br>**प्राथमिक** |
| १२. | महाराष्ट्र अ‍ॅकॅडमी ऑफ इंजिनिअरिंग अ‍ॅण्ड एज्युकेशनल रिसर्च, पुणे | विश्वशांती गुरुकूल स्कूल, केगाव, सोलापूर | माईर्स एम.आय.टी. कॉलेज, पुणे संचलित विश्वशांती गुरुकूल स्कूल, मौजे केगाव, जि.सोलापूर<br>माध्यम मराठी<br>नवीन शाळा<br>माध्यमिक | महाराष्ट्र अ‍ॅकॅडमी ऑफ इंजिनिअरिंग अ‍ॅण्ड एज्युकेशनल रिसर्च, पुणे संचलित<br>विश्वशांती गुरुकूल स्कूल, केगाव, ता. उत्तर सोलापूर, जि. सोलापूर<br>माध्यम इंग्रजी<br>नवीन शाळा<br>माध्यमिक |
| १३. | महाराष्ट्र अ‍ॅकॅडमी ऑफ इंजिनिअरिंग अ‍ॅण्ड एज्युकेशनल रिसर्च, पुणे | विश्वशांती गुरुकूल स्कूल, केगाव, सोलापूर | विश्वशांती गुरुकुल सी.बी.एस.ई.स्कूल, पंढरपुर संचलित,<br>विश्वशांती गुरुकुल सी.बी.एस.ई.स्कूल, केगाव, ता. उत्तर सोलापूर<br>माध्यम -मराठी<br>नवीन शाळा<br>उच्च माध्यमिक | महाराष्ट्र अ‍ॅकॅडमी ऑफ इंजिनिअरिंग अ‍ॅण्ड एज्युकेशनल रिसर्च, पुणे संचलित,<br>विश्वशांती गुरुकुल स्कूल, केगाव, ता. उत्तर सोलापूर<br>माध्यम- इंग्रजी<br>नवीन शाळा<br>उच्च माध्यमिक<br>Principal<br>The Lexicon School<br>Pune - 412308. |

महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ अंतर्गत स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर नवीन शाळा स्थापन करणे, तसेच, विद्यमान शाळेचा दर्जावाढ करण्यासाठी २०१७-१८ या शैक्षणिक वर्षाकरीता परवानगी देण्याबाबत ....

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
शासन निर्णय क्रमांकः एसएफएस-१०१८/प्र.क्र. ८१९/एसएम- २
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक:- ४ मे, २०१८

प्रस्तावना -

जेनेसिस एज्युकेशन सोसायटी, माणिकचंद, मलबारहिल कोंढवा, पुणे संचलित द लेक्सीकन स्कुल, फुरसुंगी, ता.हवेली, जि.पुणे या शाळेस स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर मान्यता देण्याचा प्रस्ताव शासनास सादर झाला होता. सदर प्रस्तावास मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय-

२.१ महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ (सन २०१३ चा ०१) अंतर्गत जेनेसिस एज्युकेशन सोसायटी, माणिकचंद, मलबारहिल कोंढवा, पुणे संचलित द लेक्सीकन स्कुल, फुरसुंगी, ता.हवेली, जि.पुणे या शाळेस (प्राथमिक ते उच्च माध्यमिक, इयत्ता १ली ते १२ वी, सर्व शाखा, इंग्रजी माध्यम, सी बी. एस. ई. ) सन २०१७-१८ या शैक्षणिक वर्षापासून स्वयंअर्थसहायित तत्वावर सुरु करण्यास खालील अटी व शर्तींची पूर्तता करण्याच्या अधीन राहून शासन परवानगी देण्यात येत आहे.

२.२ अटी व शर्ती -

(१) सदर संस्थेने संस्थेच्या नावाने एकूण ४० आर. जमिनीबाबतच्या ७/१२ चा अदययावत उतारा / खरेदी खत / नोंदणीकृत बक्षिसपत्र किंवा जमीन भाडेकरार (लिज) असल्यास ३० वर्ष कालावधीचा नोंदणीकृत भाडेकरार विभागीय शिक्षण उपसंचालक, पुणे यांच्याकडे ३ महिन्याच्या आत सादर करणे आवश्यक आहे.

(२) सदर शाळेने बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ मधील तरतुदींचा व या अंतर्गत वेळोवेळी विहित करण्यात येणा-या सर्व नियमांची /तरतुदींची पुर्तता करणे आवश्यक आहे.

(३) शाळेच्या व्यवस्थापनाने अधिनियम, २००९ मधील तरतुदींची पुर्तता करुन सन २०१७-१८ या शैक्षणिक वर्षात शाळा सुरु करण्यास खालीलप्रमाणे परवानगी (इरादा पत्र) देण्यात येत आहे:-

Principal
The Lexicon School
Pune - 412308.

अ) व्यवस्थापनाकडे शाळा स्थापन करण्यासाठी शासनाच्या विहित नियमानुसार आवश्यक असलेल्या सर्व बाबींची पुर्तता असल्यास शैक्षणिक वर्ष सुरु झाल्यापासून एक महिन्याच्या आत प्रथम मान्यतेसाठी संबंधित जिल्ह्यांच्या शिक्षणाधिकाऱ्यांकडे व्यवस्थापनाने अर्ज करावा.

ब) व्यवस्थापनास सन २०१७-१८ करिता या शासन निर्णयाद्वारे पात्र ठरविण्यात आले असल्याने शाळा स्थापन करण्यासाठी शासनाच्या विहित नियमानुसार आवश्यक असलेल्या सर्व बाबी उपलब्ध नसतील तर त्यांना सदर बाबींची पूर्तता करून या शासन निर्णयाच्या दिनांकापासून अठरा महिन्याच्या आत शाळा सुरु करणे बंधनकारक राहील अन्यथा दिलेली परवानगी आपोआपच रद्दबातल ठरेल.

क) शासन निर्णय दि. २० जून, २०१२ मध्ये विहित केलेल्या सर्वंकष धोरणानुसार सी.बी.एस.ई. मंडळाशी संलग्नतेकरिता ना-हरकत प्रमाणपत्र (N.O.C.) मिळविण्यासाठी प्रथमत: शाळेस मान्यता (Recognition) घेणे आवश्यक राहील. शाळेने अशी मान्यता (Recognition) सदर शासन निर्णयातील परिच्छेद (१०) नुसार जिल्हा शिक्षणाधिकारी (प्राथमिक)/ जिल्हा शिक्षणाधिकारी (माध्यमिक) /शिक्षण निरीक्षक, बृहन्मुंबई यांचेकडून मिळाल्यानंतर मान्यता पत्रासह संस्था संबंधित मंडळाच्या संलग्नता ना-हरकत प्रमाणपत्र (N.O.C.) मिळविण्यासाठी शासनास अर्ज करेल. सदर अर्जाची छाननी करुन सदर संबंधित शाळा विहित निकष, अटी व शर्तीची पूर्तता करीत असल्यास शासन शाळेस मंडळ संलग्नतेसाठी ना-हरकत (N.O.C.) प्रमाणपत्र देईल.

(४) परवानगी देण्यात आलेल्या शाळेस i) शासनाच्या वेळोवेळी निर्गमित होणा-या आदेशांचे व कार्यपध्दतीचे तसेच, ii) महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ (सन २०१३ चा ०१) मधील सर्व तरतूदींचे पालन करणे बंधनकारक राहील

(५) संबंधित सक्षम अधिका-यांनी अधिनियम, २००९ मधील तरतुदींची पुर्तता झाली असल्याची खात्री करावी व त्यानंतरच प्रथम मान्यता देण्याबाबतची पुढील कार्यवाही करावी.

(६) संस्थेने शाळा परवानगीसाठी मागणी केलेले माध्यम, शाळेचे ठिकाण इत्यादी मध्ये भविष्यात कोणताही बदल करता येणार नाही. शासनाने ज्या ठिकाणी शाळा सुरू करण्यासाठी परवानगी दिलेली आहे त्या ठिकाणाव्यतिरिक्त अन्य ठिकाणी शाळा सुरु केल्यास शासनाने दिलेली परवानगी आपोआप रद्द समजण्यात येईल.

(७) यु-डायस डाटा:- या शासन निर्णयाद्वारे परवानगी देण्यात आलेल्या नवीन शाळा / दर्जावाढ शाळा बाबत जिल्हानिहाय U-DISE(Unified District Information System for Education) मध्ये माहिती भरताना, "*स्वयंअर्थसहाय्यित तत्वावरील परवानगी प्राप्त शाळा*" म्हणून स्वतंत्र प्रवर्गात नोंद करुन यु- डायस क्रमांक प्राप्त करुन घेण्याबाबतची जबाबदारी संबंधित संस्थेवर राहील. याबाबतची पुढील कार्यवाही करण्यासाठी राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई यांना नोडल अधिकारी म्हणून घोषित

Principal
The Lexicon School
Pune - 412308.

फले आहे. त्याचप्रमाणे, संस्थेने, सर्व संबंधितांच्या माहितीकरीता " स्वयंअर्थसहाय्यित तत्वावरील परवानगी प्राप्त नवीन शाळा/ दर्जावाढ परवानगी प्राप्त शाळा" असा जाहीर फलक शाळेच्या बाहेर प्रवेशद्वारावर लावणे आवश्यक राहील.

(८) परवानगी दिलेल्या स्वयंअर्थसहाय्यित शाळेमध्ये शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांची भरती शासनाच्या.प्रचलित नियम व धोरणाप्रमाणे करावी.

३. सदर आदेश संबधित संस्थेस १५ दिवसात कळविण्याची जबाबदारी संबंधित विभागीय शिक्षण उपसंचालक यांची राहील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

(आ.ना. भोंडवे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे
२. राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई
३. शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे
४. शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे
५. विभागीय शिक्षण उपसंचालक, पुणे
६. शिक्षणाधिकारी (प्राथमिक/माध्यमिक), जिल्हा परिषद, पुणे
७. निवडनस्ती (एसएम-२)

Principal
The Lexicon School
Pune - 412308.